मा. प्राचार्य साहेब,

दै. पुढारी दि. १५/१/२१ पान २

# टी. सी. महाविद्यालयात आज वेबिनार

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

संरक्षण क्षेत्रातील आव्हानांचा आढावा घेण्यासाठी बारामतीमधील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'क्रायसिस ऑफ सिक्युरिटी चॅलेंजेस- अ ग्लोबल कन्सर्न' या विषयावर दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाच्या पुढाकाराने शुक्रवारी (दि. १५) या वेबिनारला सुरुवात होणार आहे.

लोकसंख्या आणि सुरक्षा संकट, दहशतवाद, सांस्कृतिक आक्रमण आणि राष्ट्रीय सुरक्षा, व्यापारयुद्धाचे जगावर होणारे परिणाम, हिंदी महासागराचे भूराजनीतिक महत्त्व, रासायनिक शस्त्राचा जागतिक सुरक्षेवर होणारा परिणाम आदी विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यात सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी केले आहे. वेबिनारच्या नोंदणीची लिंक महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देण्यात आली असल्याचे संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. देविदास भोसले यांनी सांगितले. या वेबिनारमध्ये नायजेरियातील नोवेना विद्यापीठाचे प्रा. एनग्बोवाजी डॅनियल एन्ते, तसेच बांग्लादेश, ढाका येथील जगन्नाथ विद्यापीठाचे प्रा. डॉ. अरुण कुमार गोस्वामी, कमांडर डॉ. भूषण दिवाण, गुजरात सेंट्रल युनिव्हर्सिटीचे डॉ. संजय झा, जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीचे (जेएनयू) नवी दिल्ली येथील डॉ. लक्ष्मणकुमार बेहेरा, केरळ सेंट्रल युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. जयप्रसाद मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी १५/१/२१ २

दै. सकाळ दि. १५/१/२१ पान ५

## तुळजाराम महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय वेबिनार

**बारामती, ता. १४ :** संरक्षण क्षेत्रातील आव्हानांचा आढावा घेण्यासाठी क्रायसिस ऑफ सिक्युरिटी चॅलेनजेस- अ ग्लोबल कन्सर्न' या विषयावरील आंतरराष्ट्रीय वेबिनारचे येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये शुक्रवार (ता. १५) व शनिवारी (ता. १६) आयोजन केल्याचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी सांगितले.

बेविनारमध्ये नायजेरियातील नोवेना विद्यापीठाचे एनग्बोवाजी डॅनियल एन्ते, ढाका येथील जगन्नाथ विद्यापीठाचे डॉ. अरुण कुमार गोस्वामी, डॉ. कमांडर भूषण दिवाण, गुजरात सेंट्रल विद्यापीठाचे डॉ. संजय झा, दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे डॉ. लक्ष्मणकुमार बेहेरा, तसेच केरळ विद्यापीठाचे डॉ. जयप्रसाद मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळ १५/१/२१ ५

Tuljaram Chaturchand College Library Baramati

२ पुढारी
पुणे, शनिवार, ३० जानेवारी २०२१

# भारताकडून संरक्षणाच्या अपेक्षा : प्रा. एन्ते

## टी. सी. महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय वेबिनार उत्साहात

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

आफ्रिकेतील गृहयुद्ध, नरसंहार, बेरोजगारी, दहशतवाद, भूकमारी अशा भयंकर समस्यांवर संयुक्त राष्ट्रसंघ आणि विकसित देशाकडून पूर्णपणे दखल घेतली जात नाही. त्यामुळे भारतासारख्या जबाबदार देशाकडून संरक्षणाच्या अपेक्षा वाढत आहेत, असे मत नायजेरियातील नोवेना विद्यापीठाचे प्रा. नबोवजी डॅनियल एन्ते यांनी केले.

बारामतीतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाच्या वतीने 'क्रायसिस ऑफ सिक्युरिटी चॅलेंजेस-अ ग्लोबल कन्सर्न' या विषयावर आंतरराष्ट्रीय ऑनलाइन वेबिनारचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या वेबिनारमध्ये विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी सहभाग घेऊन संरक्षण क्षेत्रातील आव्हानांचा आढावा घेतला. कमांडर भूषण दिवाण यांनी हिंदी महासागराचे आणि ब्ल्यू इकॉनॉमीचे महत्त्व पटवून दिले. तसेच चीनच्या हिंदी महासागरातील वाढत्या हस्तक्षेपाबद्दल चिंता व्यक्त केली.

चीनच्या विस्तारवादी धोरणावर बोलताना केरळ विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रा. के. जय प्रसाद म्हणाले, गरीब देशांमध्ये आर्थिक गुंतवणूक करून चीन तेथे राजकीय संधी साधत आहे. त्यामुळे अशा देशांमध्ये अस्थिरता वाढत जाऊन सुरक्षेच्या समस्या वाढल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

डॉ. चंद्रकांत भांगे यांनी दक्षिण आशियातील संरक्षण समस्या आणि अशियातील शांतता टिकवण्याच्या दृष्टिकोनातून भारताच्या वाढत्या जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या.

जागतिक आरोग्य, शांतता, व्यापारी युद्धे, राष्ट्रीय सुरक्षेसाठी तंत्रज्ञानाची मदत अशा महत्त्वपूर्ण विषयांवर ढाका येथील डॉ. प्रा. अरुणकुमार गोस्वामी, गुजरात विद्यापीठाचे डॉ. संजय झा, जे. एन. यू. दिल्लीचे डॉ. लक्ष्मणकुमार बेहेरा, डॉ. विपलब देबनाथ, राधा रघुरामपतरुणी, आशमा सहानी यांनी विचार मांडले. ममता जहाँगीर यांनी आण्विक, जैविक समस्यांबरोबर रासायनिक शस्त्रांचा धोका अजून संपलेला नाही आणि अजून बऱ्याच देशाकडून रासायनिक शस्त्रे पूर्णपणे नष्ट केलेली नसल्याचे सांगून चिंता व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. वेबिनारसाठी शुभेच्छा देताना ते म्हणाले, आज प्रत्येक राष्ट्राला सुरक्षिततेची अनेक आव्हाने आहेत. या आव्हानांचा परिणाम जागतिक पातळीवरसुद्धा होतो. त्यामुळे जागतिक सुरक्षिततेच्यादृष्टीने या सर्वांचा समग्र अभ्यास करणे ही काळाची गरज बनली आहे. विभागप्रमुख प्रा. देविदास भोसले यांनी प्रास्ताविक केले. प्रा. स्मिता गोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अमोल लोखंडे यांनी आभार मानले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. सकाळ दि. ०९/०२/२१ पान २

# बारामतीतील बळे यांना 'एनसीसी'चे पोरितोषिक

**बारामती, ता. ८ :** दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित केलेल्या 'एनसीसी'च्या शिबिरामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी लेफ्टनंट विवेक बळे यांना मेजर जनरल राज सिन्हा यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान केले गेले. आरडीसी कॅम्पमध्ये गार्ड ऑफ ऑनरमध्ये उत्कृष्ट सूत्रसंचालन केल्याबद्दलदेखील त्यांना पुरस्कार प्राप्त झाला.

महाविद्यालयाच्या इतिहासात पहिल्यांदाच लेफ्टनंट बळे यांची आरडीसी कॅम्पसाठी अधिकारी म्हणून निवड झाली होती. त्यांची दोन महाराष्ट्र बटालियन एनसीसी पुणेमधून इंटर ग्रुप कॉम्पिटिशन आरडीसीसाठी निवड केली होती. त्यांनी पुणे ग्रुपचे प्रतिनिधित्व केले.

छात्रांना सर्व्हिस सब्जेक्ट्स, ड्रिल यासारख्या विषयांमध्ये मार्गदर्शन केले. त्यामुळे ११ पैकी १० एनसीसी कॅडेट्स दिल्ली येथे होणाऱ्या आरडीसी कॅम्पसाठी निवडले गेले. यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ११४ ऐवजी फक्त २६ छात्रांना आरडीसी कॅम्पसाठी निवडले. त्यामध्ये सर्वाधिक पुणे ग्रुपचे समाविष्ट झाले होते.

इंटर ग्रुप कॉम्पिटिशन आरडीसीमधील कामगिरीबरोबर लेफ्टनंट बळे यांना वर्षी महानिर्देशक बॅटन व सुवर्णपदक प्राप्त झाले. त्यामुळे त्यांची एनसीसीमधील सर्वोच्च शिबीर म्हणजेच आरडीसीसाठी निवड झाली. राजपथावर संचलन स्पर्धेमध्ये देखील महाराष्ट्राला प्रथम स्थान प्राप्त झाले. पंतप्रधान रॅलीमध्ये महाराष्ट्राला रनर अपचा किताब प्राप्त झाला. कॅडेट्सबरोबर संघ व्यवस्थापक म्हणून कर्नल प्रशांत नायर, नायब सुभेदार किरण माने व मेजर आरुषा शेटे होते.



दिल्ली : बारामतीच्या टीसी महाविद्यालयाचे लेफ्टनंट विवेक बळे यांचा सत्कार करताना मेजर जनरल राज सिन्हा.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा. प्राचार्य साहेब

दै. पुढारी दि ०९/०२/२१ पान ३

# सुषमा संगई यांना गुणवंत शिक्षकेतर पुरस्कार



**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी सुषमा संगई यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या वर्धापनदिनी बुधवारी (दि. १०) होणाऱ्या कार्यक्रमात त्याचे वितरण होणार आहे. रोख रुपये ११ हजार, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रशासनास हा पुरस्कार प्रथमच प्राप्त होत आहे. संगई यांनी अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, तसेच महाविद्यालयाच्या लेखा विभागात अनेक वर्षे काम केले आहे. महाविद्यालयाच्या तीनही नॅक मूल्यांकनात त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळण्यात त्यांचे योगदान आहे. या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी संगई यांचे अभिनंदन केले.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

दै. सकाळ

पुणे, गुरुवार,
११ फेब्रुवारी २०२१

४

# टीसी महाविद्यालयातर्फे माध्यमांतील संधीवर वेबिनार

## विद्यार्थ्यांना संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन

**बारामती, ता. १०** : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'न्यू मीडिया - नेचर, स्कोप अॅण्ड फ्युचर' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीजतर्फे ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान वेबिनार होणार आहे.

या तीन दिवसीय वेबिनारमध्ये कोलकत्ता येथील डॉ. उमा शंकर पांडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. माधवी रेड्डी, डॉ. विश्राम ढोले, एबीपी माझाचे प्रसन्न जोशी, शिवाजी विद्यापीठातील डॉ. निशा पवार, डॉ. अलोक जत्राटकर, द हिंदू बिझनेस लाइनचे उपसंपादक डॉ. राधेश्याम जाधव, सकाळच्या पुणे आवृत्तीचे संपादक सम्राट फडणीस, लखनौ येथील डॉ. तनू डंग हे मान्यवर नव माध्यमांविषयी मार्गदर्शन करतील.

या वेबिनारमुळे विद्यार्थ्यांना नव माध्यमांची ताकद कळेल असा, विश्वास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी व्यक्त केला आहे.

महाविद्यालयातील रुसा योजनेच्या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी 'न्यू मीडिया- नेचर, स्कोप अॅण्ड फ्युचर' हे वेबिनार आयोजित केल्याची माहिती उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे यांनी दिली. वेबिनार सर्वांसाठी विनामूल्य असून त्यासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाऊन विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन विभागप्रमुख रणजित पंडित यांनी केले आहे.

दै. पुढारी / दि ११/०२/२०२१ पान ९

# टीसी महाविद्यालयात आजपासून वेबिनार

**बारामती** : कोरोनानंतरच्या न्यू नॉर्मलमध्ये तर सगळ्यांचा इंटरनेट हा आधार होतोय. हाच धागा पकडत बारामतीमधल्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात 'न्यू मीडिया - नेचर, स्कोप अँड फ्युचर' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीजकडून दिनांक ११ ते १३ फेब्रुवारी दरम्यान वेबिनार होणार आहे. या वेबिनारमध्ये राष्ट्रीय स्तरावर कार्यरत असणारे प्राध्यापक, संपादक, पत्रकार मार्गदर्शन करणार आहेत, असे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे यांनी सांगितले. वेबिनार सर्वांसाठी विनामूल्य असून त्यासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन विभागप्रमुख प्रा. रणजित पंडित यांनी केले आहे.

पुढारी ११/२/२१

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

मा. प्राचार्य साहेब

दै. लोकमत दि. १२/०२/२३ पान २

# संगई यांना गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी सुषमा संगई यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार जाहीर झाला [illegible] तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या प्रशासनास हा पुरस्कार प्रथमच प्राप्त होत आहे.

सुषमा संगई या गेली २५ वर्षांपासून कार्यरत असून त्या गेली ६ वर्षांपासून लघुलेखक पदावर कार्यरत आहेत. अनेकान्त एज्युकेशन सोसायटी तसेच महाविद्यालयाच्या लेखा विभागामध्ये त्यांनी अनेक वर्षे काम केले आहे. महाविद्यालयाच्या तीनही एनएसी मूल्यांकनामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारीची कामे केली आहेत. तसेच 'उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' मिळणेबाबतच्या कामांमध्ये त्यांचे योगदान संस्मरणीय आहे. या पुरस्काराने त्यांनी संस्था व महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातला आहे. त्यांच्या या यशाबद्दल




सुषमा संगई यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

संस्थेचे सचिव जवाहर शाह वाघोलीकर, संस्थेचे विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांनी संगई यांचे अभिनंदन केले आहे.

दै. लोकमत दि. १२/०२/२३ पान २

दै. लोकमत १२/०२/२०२३ पान २



Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★


# एनसीसी अधिकारी लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांना पारितोषिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांना दिल्ली येथे पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित एनसीसीच्या सर्वोच्च शिबिरामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मेजर जनरल राज सिन्हा यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

त्याचबरोबर आरडीसी कॅम्पमध्ये गार्ड ऑफ ऑनरमध्ये उत्कृष्टपणे सूत्रसंचालन केल्याबद्दल देखील त्यांना पुरस्कार प्राप्त झाला. टी. सी. कॉलेजच्या इतिहासात पहिल्यांदाच लेफ्टनंट बळे यांची आरडीसी कॅम्पसाठी अधिकारी म्हणून निवड झाली होती.



लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांना मेजर जनरल राज सिन्हा यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

लेफ्टनंट प्रा. विवेक बळे यांच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शाह, प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, पुणे ग्रुपचे कमांडर ब्रिगेडियर सुनील लिमये यांनी त्यांचे अभिनंदन केले.

ADS
१२.२.

दैनिक सकाळ दि. 23/02/2021 पान नं. ५.

# एस. पी. कदम यांचे निधन



**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे सेवानिवृत्त माजी प्राचार्य एस. पी. कदम यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. महाविद्यालयात कदम यांनी समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून ३५ वर्षे काम पाहिले.

प्राचार्यपदाची धुरा देखील त्यांनी सांभाळली. महाविद्यालयाच्या पहिल्या फळीमधील इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र या विषयाचे ते एक उत्तम प्राध्यापक होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांच्या पुस्तकांचा पदवीच्या अभ्यासक्रमात अंतर्भाव केला होता. ते उत्तम साहित्यिक म्हणूनही सुप्रसिद्ध होते.

कदम यांच्या निधनामुळे अनेकांत एज्युकेशन सोसायटी व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा एक खंदा पुरस्कर्ता हरपल्याचे संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. सकाळ 23/2/21 ५

दैनिक पुढारी दि. 23/02/21 पान नं. 2

# माजी प्राचार्य एस. पी. कदम यांचे निधन

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**



येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे निवृत्त प्राचार्य एस. पी. कदम यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. महाविद्यालयात कदम यांनी समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून ३५ वर्षे काम पाहिले. प्राचार्यपदाची धुरादेखील त्यांनी सांभाळली. महाविद्यालयाच्या पहिल्या फळीमधील इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र या विषयांचे ते एक उत्तम व्यासंगी प्राध्यापक होते.

प्राचार्य कदम यांनी अनेक पुस्तके लिहिली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या पुस्तकांचा अंतर्भाव पदवीच्या अभ्यासक्रमात केला होता. ते उत्तम साहित्यिक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या निधनामुळे अनेकान्त एज्युकेशन सोसायटी व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा एक खंदा पुरस्कर्ता हरपल्याचे संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर यांनी नमूद केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. पान 2
पुढारी 23/2/21

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

सा. [illegible] दि २४/०२/२० पान ७

२/२०२१

# जेष्ठ सेवानिवृत्त माजी प्राचार्य एस.पी. [illegible]



बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील जेष्ठ सेवानिवृत्त माजी प्राचार्य एस.पी.कदम यांचे दि. १९ फेब्रुवारी २०२१ रोजी वृद्धापकाळामुळे निधन झाले. प्रा.कदम सरांनी समाजशास्त्र विभागप्रमुख म्हणून ३५ वर्षे काम पाहिले. प्राचार्य पदाची धुरा देखील त्यांनी सांभाळली. महाविद्यालयाच्या पहिल्या फळीमधील इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र या विषयाचे ते एक उत्तम प्राध्यापक होते. सरांनी अनेक पुस्तके लिहिली व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या पुस्तकांचा अंतर्भाव पदवीच्या अभ्यासक्रमामध्ये देखील केला होता. ते उत्तम साहित्यिक म्हणून ही सुप्रसिद्ध होते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निस्सीम अनुयायी होते व त्यांनी शेकडो विद्यार्थी घडवले. ते अत्यंत शांत, मनमिळावू, प्रेमळ व विद्यार्थ्यांबद्दल विशेष आस्था असणारे होते व या त्यांच्या गुणवैशिष्ट्यांमुळे ते विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये प्रिय होते. महाविद्यालयाच्या [illegible] सरांनी दिलेले योगदान [illegible] आहे. सरांच्या निधनामुळे अनेकांत एज्युकेशन सोसायटी व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचा एक खंदा पुरस्कर्ता हरपल्याचे संस्थेचे सचिव जवाहर मोतीलाल शाह वाघोलीकर यांनी नमूद केले. संस्थेचे विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी त्यांच्या दुःखद निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग 25/02/2? पान 2

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,

कला, विज्ञान व वाणिज्य, बारामती

स्वायत्त संस्था

फोन-०२११२-२२२४०५

## सेवक गणवेशासाठी निविदा सूचना

१. आमच्या महाविद्यालयीन सेवकांच्या गणवेशासाठी (शर्ट-पँट) कापड पुरवठादारांकडून २१० मीटर टेरिकॉट कापडासाठी मोहर बंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांत कापडाच्या नमुन्यासह दरपत्रके पाठवून द्यावीत.

२. वरील २१० मीटर कापडाचे ६० गणवेश शिवावयाचे आहेत. तरी इच्छूक कुशल व अनुभवी टेलर्सनी ८ दिवसांत स्वतंत्रपणे दरपत्रके त्वरीत पाठवून द्यावीत.

उपरोक्त दोन्ही प्रकारची दरपत्रके स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा हक्क महाविद्यालयाने आपणांकडे राखून ठेवला आहे.

**प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद
महाविद्यालय, बारामती

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन
सोसायटी, बारामती

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

ABC
27.2.

साप्ताहिक 'रणझुंज' दि. 24/03/2021 पान नं. 5

# अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बारामती - येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ व २७ मार्च रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषद ही ई-प्लॅटफॉर्मवर घेण्यात येणार आहे.

डिजीटल एरा : रिइमॅजीनिंग ग्लोबल एरिना या विषयावरील चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमोल गोजे, संचालक इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड बिजनेस अॅडमिनीस्ट्रेशन, अकोले, तांत्रिक वक्ते म्हणून डॉ.एन.सी. राजलक्ष्मी, प्राध्यापक, सिवा सिवानी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सिकंदराबाद यांची उपस्थिती असणार आहे. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. अरहंतदास शाह (सराफ) व सचिव श्री. जवाहर शहा (वाघोलीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली एआयएमएस, बारामती ही संस्था तिच्या स्थापनेपासून दरवर्षी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करीत आलेली आहे. सदर परिषदांना देशातील विविध राज्यामधून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आलेला आहे. व या परिषदेसही असाच प्रतिसाद मिळेल अशी एआयएमएसच्या सर्व प्राध्यापक वृंदाना खात्री आहे.

अनेकांत इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे सचिव श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) या परिषदेच्या अध्यक्षस्थानी असतील. संस्थेचे संचालक डॉ. एम.ए.लाहोरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. व्हि. एन. सायंकर हे या परिषदेचे समन्वयक म्हणून काम पाहतील.

सा. रणझुंज 24/3/21 पान 5

दैनिक पुढारी दि. 23/03/2021 पान नं. 2

## अनेकान्त इन्स्टिट्यूटमध्ये राष्ट्रीय परिषद

**बारामती :** येथील अनेकान्त इन्स्टिट्यूटमध्ये २६ व २७ मार्च रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने याचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीषद ऑनलाइन घेण्यात येणार आहे. 'डिजीटल एरा : रिइमॅजीनींग ग्लोबल एरिना' या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमोल गोजे, डॉ. एन. सी. राज्यलक्ष्मी यांची उपस्थिती असणार आहे. संस्थेचे सचिव मिलिंद शहा (वाघोलीकर) या परिषदेच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. संस्थेचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. व्ही. एन. सायंकर परिषदेचे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. अनेकान्त सोसायटीचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) व सचिव जवाहर शहा (वाघोलीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली एआयएमएस बारामती ही संस्था दरवर्षी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करत असते. या परिषदांना देशातील विविध राज्यातून उस्फूर्त प्रतिसाद मिळतो.

पुढारी 23/3/21 2

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

मा. प्राचार्य साहेब.

साप्ताहिक रणशिंग दि २५/०३/२०२१ पान नं.१०

# प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी करिता विशेष कोरोना लसीकरण शिबीर संपन्न



बारामती - निरामय मेडिकल फौंडेशन अँड रिसर्च, बारामती व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, यांचेमध्ये झालेल्या संयुक्त करारांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व महिलांसाठी तसेच एन.एस.एस., एनसीसी इ. साठी विविध आरोग्यविषयक उपक्रम यशस्वीरीत्या आयोजित केले गेले. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाचे स्टाफ वेलफेअर समिती अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकरिता विशेष कोरोना लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये महाविद्यालयातील वय वर्षे ४० पेक्षा अधिक असणाऱ्या ८० प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचे प्रथम फेरीत डॉ.देशपांडे यांच हॉस्पिटल मध्ये लसीकरण केले गेले. दुसऱ्या फेरीत उर्वरित सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व त्यांचे नातेवाईक यांचे कोरोना लसीकरण केले जाणार आहे. या लसीकरण उपक्रमासाठी स्टाफ वेलफेअर समितीचे चेअरमन डॉ.हनुमंत फाटक व सौ.सुषमा संगई यांनी विशेष सहकार्य केले. महाविद्यालयाचे , प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. डॉ.अशोक देशपांडे व त्यांचे सहकारी यांचे या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष सहकार्य दिले त्याबद्दल महाविद्यालयाच्या स्टाफ वेलफेअर समितीने डॉ.अशोक देशपांडे व डॉ.सौ.कल्पना देशपांडे व त्यांचा सर्व स्टाफ यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचा सत्कार केला व विशेष आभार मानले.

सा. रणशिंग २५/३/२१ पान १०

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati

ABS 26/3

दैनिक सकाळ दि. ३१/०३/२०२१ पान.नं. ४

# बारामतीच्या डॉ. माधुरी पाटील यांचा सन्मान

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांना डेहराडून येथील असोसिएशन ऑफ प्लॅन्ट सायन्स रिसर्चर्स (एपीएसार) प्लांटिका फाउंडेशनच्या वतीने यंग प्लॅन्ट सायंटिस्ट अवॉर्ड २०२१ प्रदान करण्यात आला. सावंतवाडी येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाने २६ व २७ मार्च रोजी आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सावंतवाडी येथील सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोसले यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन त्यांना पुरस्कृत केले. डॉ. माधुरी पाटील या १० वर्षांपासून महाविद्यालयात वनस्पतिशास्त्र विभागात को-ऑर्डिनेटर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केले आहेत. संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. शशिकांत चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सकाळ ३१/३/२१ ४

---

दै. लोकमत दि. २६/०३/२०२१ पान नं. ३

## राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

बारामती : बारामती येथे अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने २६ व २७ मार्च रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीषद ई- प्लॅटफॉर्मवर घेण्यात येणार आहे. डिजिटल एरा : रिइमॅजीनिंग ग्लोबल एरिना या विषयावरील चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमोल गोजे, डॉ. एन. सी. राज्यलक्ष्मी यांची उपस्थिती असणार आहे. अनेकान्त सोसायटीचे अध्यक्ष अरहंतदास शहा(सराफ) व सचिव जवाहर शहा(वाघोलीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली एआयएमएस बारामती ही संस्था दर वर्षी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करत असते. या परिषदांना देशातील विविध राज्यातून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. संस्थेचे सचिव मिलिंद शहा(वाघोलीकर) या परिषदेच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. संस्थेचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. व्ही. एन. सायंकर परिषदेचे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत सर्वांनी उत्स्फुर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. २६/३/२१

लोकमत ३

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा० प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. ३१/०३/२०२१ पान नं. ३




डॉ. माधुरी पाटील यांना यंग प्लॅन्ट सायंटिस्ट ॲवॉर्डने सन्मानित करताना मान्यवर.

# डॉ. पाटील यांना यंग सायंटिस्ट ॲवॉर्ड

बारामती : तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांना यंग प्लॅन्ट सायंटिस्ट ॲवॉर्ड २०२१ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार असोसिएशन ऑफ प्लॅन्ट सायन्स रिसर्च (एपीएसार) प्लांटिका फाउंडेशन, डेहराडून उत्तराखंड यांचे वतीने देण्यात येतो. सावंतवाडी येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोसले यांचे हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. डॉ. माधुरी पाटील या १० वर्षांपासून या महाविद्यालयात आहेत. त्या ६ वर्षांपासून वनस्पतीशास्त्र पदव्युत्तर विभागात समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेत रिसर्च पेपर सादर केले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), प्राचार्य, डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शशिकांत चव्हाण, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. पुढारी ३१/३/२१ पान ३

Tuljaram Chaturchand College Library Baramati

ABS 31.3.

साप्ताहिक शाहिन दिनांक १/०४/२०२१ पान नं. ११

# डॉ. माधुरी पाटील यंग प्लॅन्ट सायंटिस्ट अवार्ड २०२१ ने सन्मानित



बारामती- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ.माधुरी पाटील यांना असोसिएशन ऑफ प्लॅन्ट सायन्स रिसर्च (एपीएसार) प्लांटिका फाऊंडेशन, डेहराडून उत्तराखंड यांचे वतीने यंग प्लॅन्ट सायंटिस्ट अवार्ड प्रदान करण्यात आला. सावंतवाडी येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाने दि. २६ व २६ मार्च २०२१ रोजी आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सावंतवाडी येथील सिंधुदूर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोसले यांचे हस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत स्मृतिचिन्ह, मेडल व प्रमाणपत्र देऊन त्यांना पुरस्कृत केले गेले.

डॉ. माधुरी पाटील या गेली १० वर्षापासून या महाविद्यालयात असून त्या या गेली ६ वर्षापासून वनस्पतीशास्त्र पदव्युत्तर विभागात को-ओर्डीनेटर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केले आहेत. २०१६ साली महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री.जवाहर शाह (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.शशिकांत चव्हाण, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विदयार्थी विद्यार्थिनी यांनी डॉ.माधुरी पाटील यांचे अभिनंदन केले आहे. सा.शाहिन १/४/२१ ११

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati

साप्ताहिक शाहिन दि.१/४/२०२१ पान नं ४

# आशिष तावरे याची भारतीय सैन्य दलात निवड



बारामती - येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील आशिष तावरे या विद्यार्थ्यांची रिलेशनशिप भरती मधून आर्मी अविएशन कॉर्पस मध्ये सोल्जर टेक्निकल एंट्री स्कीम मार्फत भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. आशिष तावरे हा तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात तृतीय वर्ष बीबीए (सीए) या वर्गात शिकत असून त्याचा महाविद्यालयातील एनसीसी मध्ये देखील सक्रिय सहभाग आहे. त्याने एन सी सी मध्ये सीएचएम ही रँक मिळवली असून बी प्रमाणपत्र परीक्षेमध्ये ए ग्रेड मिळवली आहे. आशिष तावरे याने सिकंदराबाद येथे भरतीसाठी प्रथम शारीरिक चाचणी व त्यानंतर लगेचच वैद्यकीय चाचणी पहिल्याच प्रयत्नात यशस्वी पणे पार पाडली. दि. २८ फेब्रुवारी २०२१ रोजी त्याने लेखी परीक्षा यशस्वीरित्या पूर्ण करून; भारतीय सैन्य दलामध्ये यशस्वीपणे पदार्पण केले आहे. आशिष तावरे या विद्यार्थ्याला महाविद्यालयातील लेफ्टनंट विवेक बळे यांनी मार्गदर्शन केले. त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव माननीय जवाहर शहा वाघोलीकर व संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, यांनी त्याचे अभिनंदन केले व भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सा.शाहिन १/४/२१ ४

साप्ताहिक रणशिंग दि. ७/४/२०२१ पान नं. १२

# अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची राष्ट्रीय परिषद संपन्न

बारामती - येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे दि. २६ व २७ मार्च रोजी राष्ट्रीय परिषद ई-फ्लॅटफॉर्मवर पार पडली.

डिजीटल एरा:रिइमॅजीनिंग ग्लोबल एरिना या विषयावरील चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अमोल गोजे, पुणे व तांत्रिक वक्ते म्हणून डॉ. एन.सी. राज्यलक्ष्मी, प्राध्यापक, सिवा सिवानी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सिकंदराबाद यांनी डिजीटलायझेशन आणि त्यामुळे होणारे सामाजिक व व्यवहारिक परिवर्तनाचा समग्र विकास यावर आपले मौलिक विचार व्यक्त केले. अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे सचिव श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) या परिषदेचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. अरहतदास शाह (सराफ) व सचिव श्री. जवाहर शहा (वाघोलीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली एआयएमएस, बारामती ही संस्था तिच्या स्थापनेपासून दरवर्षी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करीत आलेली आहे. संस्थेचे संचालक डॉ.एम.ए. लाहोरी, परिषदेचे समन्वयक डॉ. व्हिम. एन. सायंकर व सर्व प्राध्यापक वृंद या परिषदेस उपस्थित होते. देश-विदेशातील प्राध्यापक संशोधक व विद्यार्थ्यांनी यामध्ये आपला ऑनलाईन सहभाग दर्शविला.

या परिषदेतील उल्लेखनीय बाब ही होती की, सदर परिषदेस देशातील विविध राज्यामधून ३३ शोधनिबंध प्राप्त झाले. रिसर्च जर्नलचे प्रकाशनदेखील ई-प्लॅटफॉर्मवर करण्यात आले. या परिषदेचे सुत्रसंचालन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी केले.

अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य श्री. सोनिक आदर्श शाह (पंदारकर) यांनी आपले विचार व सदिच्छा व्यक्त केल्या. सदर परिषदेच्या चर्चासत्रामध्ये डॉ. शिल्पा बेंडले, डॉ. मोहसीन शेख, डॉ. गौरी प्रभू व डॉ. आशिष व्यास इ. मान्यवरांचे वैचारिक योगदान लाभले.

रणशिंग ७/४/२१ १२

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati

दैनिक पुढारी दि ७/४/२०२१ पान नं. ४

# अनेकान्त इन्स्टिट्यूटमध्ये राष्ट्रीय परिषद उत्साहात

बारामती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे नुकतीच राष्ट्रीय परिषद ई-प्लॅटफॉर्मवर पार पडली.

'डिजिटल एरा रिइमॅजिनिंग ग्लोबल एरिना' या विषयावरील चर्चासत्रासाठी प्रमुख म्हणून डॉ. अमोल गोजे व तांत्रिक वक्ते म्हणून डॉ. एन. सी. राज्यलक्ष्मी यांनी 'डिजिटलायझेशन आणि त्यामुळे होणारे सामाजिक व व्यावहारिक परिवर्तनाचा समग्र विकास' यावर मत व्यक्त केले. संस्थेचे सचिव मिलिंद शहा (वाघोलीकर) परिषदेच्या अध्यक्षस्थानी होते. अनेकान्ताचे अध्यक्ष अरहतदास शहा (सराफ) व सचिव जवाहर शहा (वाघोलीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली (एआयएमएस) ही संस्था स्थापनेपासून या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करीत आहे. संस्थेचे संचालक डॉ. एम. ए. लाहोरी, परिषदेचे समन्वयक डॉ. व्ही. एन. सायंकर व प्राध्यापक उपस्थित होते.

देश-विदेशातील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी यामध्ये ऑनलाइन सहभाग घेतला. या परिषदेस देशातील विविधराज्यातून ३३शोधनिबंधप्राप्तझाले. रिसर्च प्रकाशनही ई-प्लॅटफॉर्मवर करण्यात आले. गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य सोनिक शहा, डॉ. शिल्पा बेंडले, डॉ. मोहसीन शेख, डॉ. गौरी प्रभू, डॉ. आशिष व्यास यांनी योगदान दिले.

पुढारी ७/४/२१ ४

मा. प्राचार्य साहेब.

दैनिक पुढारी दि. 31/03/2021 पान. नं. 3




डॉ. माधुरी पाटील यांना यंग प्लॅन्ट सायंटिस्ट ॲवॉर्डने सन्मानित करताना मान्यवर.

## डॉ. पाटील यांना यंग सायंटिस्ट ॲवॉर्ड

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांना यंग प्लॅन्ट सायंटिस्ट ॲवॉर्ड २०२१ प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार असोसिएशन ऑफ प्लॅन्ट सायन्स रिसर्च (एपीएसार) प्लांटिका फाउंडेशन, डेहराडून उत्तराखंड यांचे वतीने देण्यात येतो. सावंतवाडी येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोसले यांचे हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. डॉ. माधुरी पाटील या १० वर्षांपासून या महाविद्यालयात आहेत. त्या ६ वर्षांपासून वनस्पतीशास्त्र पदव्युत्तर विभागात समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेत रिसर्च पेपर सादर केले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव जवाहर शाह (वाघोलीकर), प्राचार्य, डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. शशिकांत चव्हाण, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

पुढारी 31/3/21 3

Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

दैनिक सकाळ दि. 31/03/2021 पान. नं. 8

## बारामतीच्या डॉ. माधुरी पाटील यांचा सन्मान

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागातील डॉ. माधुरी पाटील यांना डेहराडून येथील असोसिएशन ऑफ प्लॅन्ट सायन्स रिसर्चर्स (एपीएसार) प्लांटिका फाउंडेशनच्या वतीने यंग प्लॅन्ट सायंटिस्ट अवॉर्ड २०२१ प्रदान करण्यात आला. सावंतवाडी येथील श्री पंचम खेमराज महाविद्यालयाने २६ व २७ मार्च रोजी आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत सावंतवाडी येथील सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेसाहेब खेमसावंत भोसले यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन त्यांना पुरस्कृत केले. डॉ. माधुरी पाटील या १० वर्षांपासून महाविद्यालयात वनस्पतिशास्त्र विभागात को-ऑर्डिनेटर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध सादर केले आहेत. संस्थेचे सचिव जवाहर वाघोलीकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, डॉ. शशिकांत चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सकाळ 31/3/21 8

5/4/21

5/4/21

सा. रणशिंग. दि. ८/४/२०२१ पा. नं. ५.

# तु. च. महाविद्यालयात ऑनलाईन पद्धतीने राष्ट्रीय वेबिनार संपन्न

बारामती-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मायक्रोबायोलॉजी विभागाच्या वतीने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत मायक्रोबियल फर्मेंटेशन: टूल्स एन्ड टेक्निक्स या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचे ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य व वेबिनारचे कन्वेनर डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी वेबिनार आयोजना- मागील हेतू व उद्दिष्ट्ये आपल्या उद्घाटनपर भाषणात स्पष्ट केले. तसेच मायक्रोबियल फर्मेंटेशनचे महत्व, भविष्यातील याबाबतच्या संशोधन संधीबद्दल आपले मत व्यक्त केले.

वेबिनारच्या पहिल्या दिवसाच्या सत्रात नाशिक येथील बायोस्पार्क्स लॅबोरोटरीज लिमिटेडचे डायरेक्टर सुरेश शिंदे यांनी बेसिक्स ऑफ फर्मेंटेशन, अपस्ट्रीम प्रोसेसिंग, डाऊन स्ट्रीम प्रोसेसिंग या विषयावर व्याख्यान दिले. तर वेबिनारच्या दुसऱ्या दिवशी नाशिक येथील कृषीदूत बायोहर्बल प्रायव्हेट लिमिटेडचे चीफ सायंटिस्ट डॉ. हे... पाटील यांनी बायोफर्टीलायझर्स एन्ड बायोपेस्टीसाईड्स प्राडक्शन या विषयावर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या दिवसाच्या सत्रामध्ये नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापक रेवती शिंदे यांनी प्रायमरी एन्ड सेकंडरी स्क्रीनिंग, इनोक्युलम प्रिपरेशन या विषयावर व्याख्यान दिले. या वेबिनारच्या व्याख्यानाचा लाभ देशातील विविध राज्यातील संशोधक व विद्यार्थ्यांनी घेतला. वेबिनारच्या पहिल्या दिवशी स्वागत आणि प्रास्ताविक मायक्रोबायोलॉजी विभाग प्रमुख व वेबिनारचे ओर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ. सुनील पवार यांनी केले. या वेबिनारचे को-ऑर्डिनेटर म्हणून डॉ. मिलिंद गजभिये यांनी जबाबदारी सांभाळली.

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

मा. प्राचार्य साहेब.

पुढारी : दि - ५|४|२०२१ - पा. नं - 3 .

## टी. सी. महाविद्यालयात वेबिनार उत्साहात

**बारामती :** येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात मायक्रोबायॉलॉजी विभागाच्या वतीने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत 'मायक्रोबियल फर्मेंटेशन : टूल्स ॲन्ड टेक्निक्स' या विषयावर तीनदिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचे ऑनलाइन उद्घाटन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांनी वेबिनार आयोजनामागील हेतू व उद्दिष्टे उद्घाटनपर भाषणात स्पष्ट केले. तसेच मायक्रोबियल फर्मेंटेशनचे महत्त्व, भविष्यातील याबाबतच्या संशोधन संधीबद्दल आपले मत व्यक्त केले. वेबिनारच्या पहिल्या दिवसाच्या सत्रात नाशिक येथील बायोस्पार्क्स लॅबोरेटरीज लिमिटेडचे संचालक सुरेश शिंदे यांनी 'बेसिक्स ऑफ फर्मेंटेशन, अपस्ट्रीम प्रोसेसिंग, डाऊन स्ट्रीम प्रोसेसिंग' या विषयावर व्याख्यान दिले. दुसऱ्या दिवशी नाशिक येथील कृषिदूत बायोहर्बल प्रायव्हेट लिमिटेडचे चीफ सायंटिस्ट डॉ. हेमंत पाटील यांनी 'बायोफर्टिलायझर्स ॲन्ड बायोपेस्टिसाईड्स प्रॉडक्शन' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवसाच्या सत्रामध्ये नाशिक येथील केटीएचएम महाविद्यालयाच्या सहायक प्रा. रेवती शिंदे यांनी 'प्रायमरी ॲन्ड सेकंडरी स्क्रीनिंग, इनोक्युलम प्रिपरेशन' या विषयावर व्याख्यान दिले. या वेबिनारच्या व्याख्यानाचा लाभ देशातील विविध राज्यांतील संशोधक व विद्यार्थ्यांनी घेतला. मायक्रोबायॉलॉजी विभागप्रमुख डॉ. सुनील पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गजभिये यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

पुढारी ५|४|२१ - 3

Tuljaram Chaturchand College
Library
★ Baramati ★

ABS
१२|४|२१

सा. वतन की लकीर दि - ११/६/२०२१ पा. नं - ४

# तु.च.महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा

**बारामती (वार्ताहर):** अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात जिमखाना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. जगभरात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयाच्या क्रिडांगण आवारात बकुळाच्या २५ रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले.

महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या अध्यक्षतेत, राहुल शहा (वाघोलीकर) यांच्या हस्ते हे वृक्षारोपण करण्यात आले. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (युएनईपी) ने यंदाच्या २०२१ वर्षासाठी 'परिसंस्था पुनर्संचयित करणे' ही थीम जाहीर केली आहे. या अंतर्गत पुन्हा एकदा पृथ्वीला चांगल्या स्थितीत आणणे. जगाच्या पर्यावरणातील परिसंस्था पुनर्संचयित करण्याच्या कार्यांवर जोर दिला जाईल. नैसर्गिक प्रतिसादांवर आणि उदयोन्मुख हिरव्या तंत्रज्ञानावर जोर देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ.जगदीश देशपांडे, डॉ.सीमा गोसावी, जिमखाना विभागाचे डॉ. गौतम जाधव, प्रा. अशोक देवकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. विलास कर्डीले, प्रा. लांडगे तसेच एन. एस. एस. व क्रीडाविभागाचे विद्यार्थी प्रतिनिधिक स्वरूपात उपस्थित होते.

दै. पुढारी. दि - ५/६/२०२१. पा. नं - ५

# 'त्या' प्राध्यापकांवर कोर्ट निर्णयाप्रमाणे कार्यवाही

**पुणे :** 'एमफिल'च्या अर्हतेवर पदोन्नतीचे (कॅस) लाभ घेणाऱ्या प्राध्यापकांवर न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी लागेल, असे स्पष्ट संकेत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर दर महिन्याला बेकायदा आर्थिक भार टाकणाऱ्या सुमारे दोन हजार प्राध्यापकांवर उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून कारवाई होण्याची शक्यता दिसून येत आहे. उदय सामंत म्हणाले की, एमफिलच्या अर्हतेवर कॅसचे लाभ घेणाऱ्या प्राध्यापकांबाबत न्यायालयाचा एक निर्णय झाला आहे. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणेच आम्हाला कार्यवाही करावी लागणार आहे. याबाबत कोणतेही दुमत नाही. न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालक करून कार्यवाही करावी लागेल, असे सामंत यांनी सांगितले.

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati

मा. प्राचार्य साहेब.

साप्ताहिक रणशिंग दि- १०/६/२०२१ पा. नं- ६

साप्ताहिक रणशिंग दि. १०/६/२०२१

# तु. चतुरचंद महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

बारामती - अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नुकतेच महाराष्ट्र शासनाने जून अर्थात छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन हा शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा होणार असल्याचे जाहीर केले होते. या सोहळ्यानिमित्त महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल विशेष ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

तत्पूर्वी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयातर्फे आयोजित विशेष ऑनलाइन व्याख्यानासाठी मराठी विभागातील ज्येष्ठ प्रा. मानाजी गावडे वक्ते म्हणून लाभले. प्रा. गावडे यांनी 'शिवराज्याभिषेक सोहळ्याचे महत्त्व व शिवचरित्राचे सार' या विषयावर आपले व्याख्यान सादर केले. व्याख्यानात बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्यास स्वतंत्र सार्वभौम राज्य म्हणून मान्यता मिळवण्यासाठी राज्याभिषेक करून घेतला होता. शिवरायांनी रयतेच्या मनातली स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात निर्माण केली होती. आरमाराची निर्मिती, सुशासन, प्रखर राष्ट्रभावना, सर्वधर्मसहिष्णुता आणि स्वराज्यातील रयतेला केंद्रस्थानी मानून राज्यकारभार करणारा जाणता राजा ही शिवरायांची महत्त्वपूर्ण गुणवैशिष्टे त्यांनी आपल्या व्याख्यानात मांडली. वेगवेगळ्या इतिहासकारांनी शिवरायांबद्दल केलेली मांडणी देखील यावेळी प्रा. गावडे यांनी सविस्तरपणे मांडली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी शिवरायांच्या विविध वैशिष्ट्यांची मांडणी केली. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजेच स्वराज्यनिष्ठा, स्व पराक्रम आणि शौर्याचे मूर्तिमंत उदाहरण होय. आपल्या अध्यक्षीय भाषणात पुढे ते म्हणाले की, महाविद्यालयाच्या अनेक कार्यक्रमांची सुरुवात शिवाजी महाराजांना नमन करूनच होत आलेली आहे. आजचा शिवराज्याभिषेक दिन सोहळा संपूर्ण महाराष्ट्रात शिव स्वराज्य दिन म्हणून विशेष पद्धतीने साजरा होत आहे. छत्रपतींचे स्मरण हे नेहमीच आपले स्फुल्लिंग चेतवणारे ठरते. आजूबाजूच्या कोरोना काळातील निराशाजनक वातावरणात आजचे छत्रपतींचे स्मरण देखील आपल्यात नवी चेतना निर्माण करणारे असेल असा आशावादही त्यांनी यावेळी प्रकट केला. या विशेष ऑनलाइन व्याख्यानासाठी महाविद्यालयाचे सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने आपला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांनी तर डॉ. संदीप तापकीर यांनी आभार प्रदर्शन केले.

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

सकाळ. दि- १५/६/२०२१ पा.नं-३

# टी. सी. महाविद्यालयात वृक्षारोपण

बारामती : येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात जिमखाना विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या वेळी महाविद्यालयाच्या क्रीडांगणाच्या आवारात बकुळाच्या २५ रोपांची लागवड करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांच्या उपस्थितीत राहुल वाघोलीकर यांच्या हस्ते हे वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. जगदीश देशपांडे, डॉ. सीमा गोसावी, जिमखाना विभागाचे डॉ. गौतम जाधव, अशोक देवकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. विलास कर्डिले, प्रा. लांडगे तसेच एनएसएस व क्रीडा विभागाचे काही विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ १५/६/२१ पा.नं ३

ABS 14.6.

मा. प्राचार्य साहेब

४ पुढारी मंगळवार, ६ जुलै २०२१

# अनेकान्त सोसायटीच्या अध्यक्षपदी जवाहर शाह

बारामती : पुढारी वृत्तसेवा

येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी जवाहल मोतीलाल शाह (वडूजकर) यांची निवड करण्यात आली.

संस्थेच्या सचिवपदी मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर), खजिनदारपदी सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीमध्ये चंद्रगुप्त माणिकलाल शाह (वाघोलीकर), विकास शशिकांत शहा (लेंगरेकर),



चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर), विद्युतकुमार माणिकचंद शहा, डॉ. हर्षवर्धन सूर्यकांत व्होरा, सत्यजित शांतिलाल शहा (पंदारकर) यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या पंचवार्षिक निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शारदाबाई पवार महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी साठे यांनी काम पाहिले.

जवाहर शाह यांनी १९९९ मध्ये सचिवपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची वेगाने घोडदौड झाली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या नावाजलेल्या संस्था सुरू झाल्या. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा अनेकान्तच्या पुढील वाटचालीसाठी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

नवनिर्वाचित नियामक समितीच्या कार्यास अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे सदस्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, अनेकांत इंग्लिश मीडियम स्कूल या सर्व संस्थांमधील प्राचार्य, संचालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

सकाळ
पुणे, मंगळवार, ६ जुलै २०२१ ३

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

## 'अनेकांत'च्या अध्यक्षपदी जवाहर वाघोलीकर



जवाहर वाघोलीकर

बारामती : येथील अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) यांची निवड झाली. संस्थेच्या सचिवपदी मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर) यांची तर खजिनदार म्हणून सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) यांची निवड झाली. संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत पुढील पाच वर्षांसाठी नव्याने निवड करण्यात आली. संस्थेची कार्यकारिणी पुढील प्रमाणे- चंद्रगुप्त माणिकलाल शहा (वाघोलीकर), विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर), विद्युतकुमार माणिकचंद शहा, डॉ. हर्षवर्धन सूर्यकांत व्होरा, सत्यजित शांतिलाल शहा (पंदारकर). शारदानगर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी साठे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले.

ABS
13/7

मा. प्राचार्यसो

गुरूवार दिनांक ८ जुलै २०२१ . सा. रणशिंग. दि- ८/७/२०२१ पा. नं- १

# अनेकान्त एज्युकेशनचे अध्यक्षपदी जवाहर वाघोलीकर

## अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी जवाहर शाह यांची निवड



बारामती- अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या दि. ४ जून २०२१ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पुढील पाच वर्षाकरिता संस्थेच्या नियामक मंडळाची कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर), सचिवपदी श्री. मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर) व खजिनदारपदी श्री. सुनील शिवलाल शहा (लेंगरेकर) यांची निवड झाली. त्याचबरोबर या कार्यकारिणीमध्ये श्री. चंद्रगुप्त माणिकलाल शाह (वाघोलीकर), श्री. विकास शशिकांत शहा (लेंगरेकर), श्री. चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर), श्री. विद्युतकुमार माणिकचंद शहा, डॉ. हर्षवर्धन सूर्यकांत व्होरा, श्री. सत्यजित शांतीलाल शहा (पंदारकर) यांची सन्माननीय सदस्य म्हणून निवड झाली. या पंचवार्षिक निवडणूकीचे निवडणूक अधिकारी म्हणून शारदानगर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी साठे यांनी कामकाज पाहिले.

श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर) यांनी सचिवपदाचा १९९९ साली पदभार स्वीकारला व त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाची घोडदौड वेगाने सुरु झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेकान्त इंग्लिश मिडीयम स्कुल, अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड स्टडीज या नावाजलेल्या संस्था सुरु झाल्या. या सर्वांच्या आजपर्यंतच्या कार्याचा तसेच नवनियुक्त सदस्यांच्या कामकाजाचा अनुभवाचा फायदा अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या पुढील प्रगतीच्या वाटचालीस नक्कीच होईल. नवनिर्वाचित नियामक समितीच्या कार्यास अनेकांत एज्यकेशन सोसायटीचे सदस्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, अनेकान्त इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, अनेकांत इंग्लिश मिडीयम स्कुल या सर्व संस्थांमधील प्राचार्य, संचालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

Tuljaram Chaturchand College Library Baramati

मा॰ प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग दि १५/०७/२०२१ पान नं. ४

दि. १५/७/२०२१

# पेन्शनर असोसिएशन तर्फे जवाहर शहा यांचा सत्कार

बारामती - येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीची गव्हर्निंग कौन्सिलची (नियामक मंडळाची) पंचवार्षिक निवडणूक दि. ०४/७/२०२१ रोजी झाली. त्यात बारामती येथील सदस्यांची बिनविरोध निवड झाली. त्यामध्ये विद्यमान सदस्य श्री. सुनिल शिवलाल शहा, मा.श्री. विकास शशिकांत शहा, मा. श्री. चंद्रवदन विद्याचंद्र शहा यांना जनरल सदस्यांनी पुन्हा नियामक मंडळावर काम करण्याची संधी दिली. घटनेप्रमाणे, वाघोलीकर कुटुंबियांमधून मा.श्री. जवाहर मोतीलाल शहा, मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा, मा.श्री. चंद्रगुप्त माणिकलाल शहा यांचे नॉमिनेशन झाले व नवीन तीन सदस्य मा.श्री. सत्यजित शांतीलाल शहा (पंदारकर), मा.डॉ. श्री. हर्षवर्धन सूर्यकांत व्होरा, मा.श्री. विद्युतकुमार माणिकचंद शहा हेही बिनविरोध आले. नियामक मंडळाच्या अध्यक्षपदी मा.जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) यांची, तर सचिव पदी मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर) व खजिनदार पदी मा.श्री. सुनिल शिवलाल शहा (लेंगरेकर) यांची एकमताने निवड करण्यात आली.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापक कर्मचारी यांच्या असोसिएशन तर्फे नूतन अध्यक्ष मा.श्री. जवाहर मोतीलाल शहा (वाघोलीकर) यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. आर.एल. सुरवडे, प्रा.डॉ.डी.व्ही. सरवदे, प्रा.डॉ. एस. सी. साळुंके, प्रा. डॉ. प्रकाश पाटील, श्री. वसंत बेलदार, श्री. राजकुमार शहा, श्री. व्ही.डी. महामुनी हे उपस्थित होते.

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

ABS 23.7.

23/7/21

# तुळजाराम महाविद्यालयाचा दोन पुरस्कारांनी गौरव

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये नि:स्वार्थी भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या नि:स्वार्थ सेवेचा यथोचित सन्मान व्हावा, या उद्देशाने हे पुरस्कार दिले जातात.

सन २०२०-२१ शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना संलग्नित महाविद्यालयामार्फत ऑनलाइन प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या प्रस्तावातून राष्ट्रीय सेवा योजनेमधील उत्कृष्ट कार्याबद्दल प्रस्तावाची शिफारस महाराष्ट्र शासनास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत करण्यात आलेली होती. याअंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार तसेच महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला. डॉ. कर्डिले हे महाविद्यालयात तेवीस वर्षांपासून संगणकशास्त्र विभागात अध्यापन करीत आहेत. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात ते गेली सहा वर्षे कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आजवर जलसंधारण प्रकल्प, स्वच्छ वारी सुंदर वारी, विविध शिबिरे, पूरग्रस्तांना मदत, आपत्ती निवारण शिबिर आदी विषयांवर मोठे काम केले आहे. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शहा वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंद शहा वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर व डॉ. विलास कर्डिले यांचे विशेष अभिनंदन केले.



**'अनेकान्त'चे अध्यक्ष जवाहर शहा यांच्या हस्ते डॉ. विलास कर्डिले यांचा सत्कार करण्यात आला.**

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati

साप्ताहिक रणशिंग दि. १८/८/२०२१ पान नं ११

# राज्यशासनाचा उत्कृष्ट महाविद्यालय व सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर

बारामती - तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राज्यशासनाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय व सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाले. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सन २०२०-२१ मध्ये निस्वार्थी भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या निस्वार्थ सेवेचा यथोचित सन्मान व्हावा या उद्देशाने हे पुरस्कार दिले जातात.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत उत्कृष्ट काम करणारे महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना राज्यस्तरावर पुरस्कार दिले जातात. या सर्वोत्कृष्ट प्रस्तावांची शिफारस राज्यस्तरीय पुरस्कारासाठी महाराष्ट्र शासनाकडे करण्यात येते. सन २०२०-२१ शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालय मार्फत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या प्रस्तावातून राष्ट्रीय सेवा योजनेमधील उत्कृष्ट कार्याबद्दल प्रस्तावाची शिफारस महाराष्ट्र शासनास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत करण्यात आलेली होती. याअंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार तसेच महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार जाहीर झाला.



डॉ. विलास कर्डिले तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात तेवीस वर्षापासून संगणक शास्त्र विभागात अध्यापन करत आहेत. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात ते गेली सहा वर्षे कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. आजवरच्या त्यांच्या या प्रवासात त्यांनी अंजनगाव येथे राबवलेले जलसंधारण उपक्रम, पुणे पंढरपूर वारी मध्ये 'सुंदर वारी, स्वच्छ वारी, निसर्ग वारी व हरित वारी' या विषयावर जनजागृतीपर पथनाट्य सादर केले आहेत. तसेच उंडवडी येथील संत तुकाराम महाराज पालखी मुक्काम स्थळी 'स्वच्छ वारी सुंदर वारी' या अंतर्गत स्वच्छता मोहीम राबवली आहे. त्याच सोबत संपूर्ण आरोग्य निदान शिबिर, शासन स्तरावरील विविध योजना, पूरग्रस्त आपत्ती निवारण शिबिर, व्यसनमुक्ती, रोड सुरक्षा, वायुप्रदूषण, स्वच्छता आणि निरोगी आरोग्य, मतदान जागृती अशा महाविद्यालय, विद्यापीठ तसेच राज्य पातळीवरील शिबिरांचे सक्रिय आयोजन केलेले आहे. या सर्व उपक्रमांची दखल घेऊन राज्य शासनाने महाविद्यालयाची व डॉ. कर्डिले यांची राज्य शासनाच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शहा वाघोलीकर, संस्थेचे सचिव मिलिंद शहा वाघोलीकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. विलास कर्डिले यांचे विशेष अभिनंदन केले

Tuljaram Chaturchand College Library * Baramati *

साप्ताहिक रणशिंग दि. ३१/०७/२०२१ पान: ४

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे

# तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

ता.बारामती, जि.पुणे

स्वायत्त

NAAC Re-accredited 'A+' Grade, ISO 9001 : 2015 Certified. जैन अल्पसंख्यांक संस्था

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नीत

वेबसाईट- www.tccollege.org

ई मेल- principal.tccollege@gmail.com संपर्क क्र. 02112-222405

## प्रवेश सूचना २०२१-२०२२

**११ वी कला, वाणिज्य, विज्ञान** (आय.टी., इलेक्ट्रॉनिक्स, संगणकशास्त्र, फूड सायन्स अँण्ड टेक्नॉलॉजी, ऑटो इंजिनिअरींग, बेकरी अँण्ड कन्फेक्शनरी)

**बी.ए.** (मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, संरक्षणशास्त्र, इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानसशास्त्र, योगा, तर्कशास्त्र, तत्वज्ञान)

**बी.कॉम., बी.बी.ए. (सी.ए.), बी.एस्सी.** (संगणकशास्त्र)

**बी.एस्सी.** (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र)

**एम.ए.** (मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र)

**एम.कॉम., डी.टी.एल.**

**एम.एस्सी.** (पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र (ऑरगॅनिक, इनऑरगॅनिक, इनालिटीकल), गणित, संख्याशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, भूगोल, पर्यावरणशास्त्र)

**एम.एस्सी.** (संगणकशास्त्र)

**बी.लीब.आय.सायन्स :** ग्रंथालय आणि माहिती विज्ञान पदवी

**एम.लीब.आय.सायन्स :** ग्रंथालय आणि माहिती विज्ञान पदव्युत्तर

**बी. व्होक.**- १) फुड प्रोसेसिंग अँण्ड पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी २) जर्नालिजम अँण्ड मास कम्युनिकेशन ३) डेअरी टेक्नॉलॉजी ४) रिटेल मॅनेजमेंट ५) ई-कॉमर्स अँण्ड डिजिटल मार्केटिंग ६) नेटवर्कींग अँण्ड सिस्टीम अँडमिनिस्ट्रेशन

**एम.व्होक.**- १) फुड प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी २) मिडिया स्टडीज

**हेल्प लाईन नं. ०२११२-२२३६३५, ९७६४७९०५१५**

अ) प्रवेश ऑनलाईन पद्धतीने

ब) माहिती पुस्तिका महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध.

**जैन अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्राधान्य.**

**प्राचार्य**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती जि.पुणे

**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी बारामती जि.पुणे

## जाहिर नोटीस

... या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात सविस्तर वर्णन केलेला गांव जळोची, ...

Tuljaram Chaturchand College ★ Library ★ Baramati

मा प्राचार्य साहेब

दैनिक पुढारी दि. २० ऑगस्ट २०२१ पान नं. ५

Anekant Education Society's

## Tuljaram Chaturchand College

of Arts, Science & Commerce, Baramati. Dist. Pune -413102

Autonomous

NAAC A+ (CGPA 3.55) Jain Religious Minority Institution

Phone – 02112-222405 website- www.tccollege.org

**REQUIRED (Sr. College, Grant CHB)**

Applications are invited from eligible candidates for the following posts of Assistant Professor in Senior College Grant Section purely on CHB for the Academic year 2021-2022.

| Sr.No. | Subject | No. of Post/s | Sr.No. | Subject | No. of Post/s |
|---|---|---|---|---|---|
| 1 | English | 03 | 9 | Physics | 04 |
| 2 | Defence Studies | 04 | 10 | Chemistry | 02 |
| 3 | Geography | 01 | 11 | Statistics | 04 |
| 4 | Psychology | 02 | 12 | Botany | 02 |
| 5 | Sociology | 01 | 13 | Zoology | 12 |
| 6 | Economics | 02 | 14 | Electronics | 01 |
| 7 | Politics | 01 | 15 | Microbiology | 03 |
| 8 | Commerce | 06 | | | 48 |

* Essential Qualification – As per Rules of UGC, Govt. of Maharashtra and Savitribai Phule Pune University, Pune.
* Preference will be given to 'Jain Candidates.'
* The posts are subject to availability of actual workload.
* Apply online on www.tccollege.org website filling all Mandatory Fields. A Printout taken or a separate hand written or Typed Application also should be send to The Principal, Tuljaram Chaturchand College, Baramati, P.B. No. 51, Baramati – 413 102 Dist. Pune, with all necessary documents attached, within 14 days from the date of Publication.

Principal
Tuljaram Chaturchand College,
Baramati

Secretary
Anekant Education Society,
Baramati

Tuljaram Chaturchand College Library ★ Baramati ★

A135

साप्ताहिक रणशिंग दि.23/12/2021 पान नं.9

# युवा संसद मध्ये तु. च. महाविद्यालयाचे सुयश

बारामती - नुकत्याच पुणे येथे एम.आय.टी. कॉलेजमध्ये पार पडलेल्या अभिरूप युवा संसद या स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला. ही स्पर्धा युवक बिरादरी यांच्या मार्फत घेण्यात आली होती. या स्पर्धेत बारामती, पुणे, सातारा, मुंबई, पनवेल या भागातून संघ आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. रवी चिटणीस कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रेडिओ जॉकी आरजे संग्राम यांनी हजेरी लावली होती. बक्षीस वितरणाच्या वेळी तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने तृतील क्रमांक पटकावला. महाविद्यालयातील ऋतिका शिंदे हिला उत्कृष्ट संसदपटू हा पुरस्कार देखील प्राप्त झाला.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा संघ बनविण्यासाठी प्रा.भीमराव तोरणे, डॉ.विलास कर्डीले आणि प्रा.राजा पाडे यांनी मार्गदर्शन केले. संघनायक म्हणून ए.बी.पाटील यांनी काम पहिले. प्रितम गुळूमकर, प्रज्वल वारे, फजल पठाण, मेघना जाधव, निलेश जाधव यांनी संघामध्ये मोलाची भूमिका बजावली.

सा. रणशिंग 23/12/21 9

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

मा. प्राचार्य साहेब

साप्ताहिक रणशिंग दि. 23/12/2021 पान नं. ५.

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयास कबड्डी स्पर्धेत विजेतेपद

बारामती - शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीच्या वतीने आंतर महाविद्यालयीन कबड्डी मुलींच्या स्पर्धा सी.के.गोयल महाविद्यालय, दापोडी व मुलांच्या स्पर्धा अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर या ठिकाणी नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामतीच्या मुलींच्या संघाने विजेतेपद तर मुलांच्या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले.

आंतर महाविद्यालयीन मुलींच्या कबड्डी स्पर्धेत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या संघाने पहिला सामना हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर यांच्या विरुद्ध झाला हा सामना २५-०२ गुणांनी जिंकला. क्वार्टर फायनलचा सामना श्री. शिवछत्रपती महाविद्यालय जुन्नर संघाबरोबर झाला. हा सामना २९-०५ गुणांनी जिंकला. सेमी फायनल मध्ये बी.आर घोलप महाविद्यालय सांगवी संघाबरोबर झाला. हा सामना ३८-१५ गुणांनी जिंकला. अंतिम सामना आण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर संघाबरोबर झाला. हा सामना देखील ५०-३६ गुणांनी जिंकला. सर्व सामन्यांमध्ये महाविद्यालयाच्या खेळाडू साक्षी काळे, ऐश्वर्या झाडबुके, तृप्ती अंधारे, गौरी सावंत, रितू बोराडे, निकिता खांडे व पूजा घाडगे या सर्वांच्या उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर विजेतेपद प्राप्त केले. मुलांचा अंतिम सामना बी.जे. महाविद्यालय आळे संघाबरोबर झाला. या अटीतटीच्या सामन्यात मुलांच्या संघास उपविजेतेपद प्राप्त झाले. मुलींच्या संघातील साक्षी काळे, तृप्ती अंधारे, गौरी सावंत व रितू बोराडे या खेळाडूंची तर मुलांच्या संघातील निखिल शिंदे, ऋषिकेश बनकर व श्रेयश उंबरदंड यांची चांदवड नाशिक या ठिकाणी होणाऱ्या आंतरविभागीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या संघास डॉ.गौतम जाधव व प्रा.अशोक देवकर यांचे मार्गदर्शन लाभले. कबड्डी मुली व मुले यांच्या विजयी व उपविजयी कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शहा (वाघोलीकर), संस्थेचे सचिव मिलिंद शहा (वाघोलीकर), महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक यांनी अभिनंदन केले आहे.

दै. पुढारी दि. 22/12/2021 पान नं. 3



टी. सी. महाविद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत करिअर कट्टा सुरू करण्यात आला.

# टी. सी. महाविद्यालयात करिअर कट्टा

बारामती : येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात राज्य उच्च शिक्षण आणि माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. जगदीश देशपांडे, डॉ. सीमा नाईक-गोसावी, डॉ. रामचंद्र सपकाळ, रजिस्ट्रार अभिनंदन शहा, आय.क्यू.ए.सी.च्या समन्वयक डॉ. योगिनी मुळे, तसेच महाविद्यालयाच्या करिअर कट्टा समन्वयक प्रा. दीपाली अनपट, डॉ. समाधान पाटील यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. महाविद्यालयात विकास केंद्र तसेच कौशल्य केंद्र स्थापन करून विद्यार्थ्यांसाठी भविष्यात त्यानुसार अनेक नवीन उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत अनेक उपक्रम विद्यार्थ्यांना अभ्यासायला मिळणार आहेत. आयएएस आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, भारतीय संविधानाचे पारायण, फाउंडेशन कोर्स, वृत्तवेध स्पर्धा परीक्षेची तयारी त्याअंतर्गत करून घेतली जाणार आहे. प्रास्ताविक डॉ. विलास काकडे यांनी केले. डॉ. समाधान पाटील यांनी आभार मानले. संस्थेचे सचिव मिलिंद शाह यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. पुढारी 3 22/12/21

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati

MBS
23/12/21